# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक – ०१ जून २०१६

## टीवाय बीकॉम आणि बीएस्सीचा निकाल १० जून रोजी

## टीवाय बीएचा निकाल  २० जून रोजी

मुंबई – मुंबई विद्यापीठामार्फत एप्रिल / मे २०१६ मध्ये घेण्यात आलेल्या टीवाय बी.कॉम आणि बीएस्सी या परीक्षांचा निकाल हा येत्या १० जून २०१६ रोजी जाहिर होणार आहे. तर टीवाय बीए या परीक्षेचा निकाल हा २० जून रोजी जाहिर होणार आहे. मुंबई विद्यापीठामार्फत एप्रिल / मे २०१६ ला कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवस्थापन, विधी व तंत्रज्ञान या विद्याशाखांच्या ४२३ परीक्षा घेण्याचे नियोजित केले होते. त्यापैकी बऱ्याचशा परीक्षा घेतल्या गेल्या असून उर्वरीत काही परीक्षा अद्यापही चालू आहेत. या परीक्षांपैकी तृतीय वर्ष कला, वाणिज्य आणि विज्ञान या परीक्षांसाठी सर्वात जास्त विद्यार्थी संख्या प्रविष्ठ झालेली असून या परीक्षांचे उत्तरपत्रिकांचे मुल्यांकनाचे काम बहुतांश पूर्ण होत आलेले असून या परीक्षांचे निकाल लवकरच जाहिर करण्यात येणार आहेत.

| परीक्षा | प्रविष्ठ विद्यार्थी संख्या | निकाल जाहिर होण्याची अपेक्षित तारीख |
|---|---|---|
| टीवाय बीकॉम | ७५००० | १० जून २०१६ |
| टीवाय बीएस्सी | १८००० | १० जून २०१६ |
| टीवाय बीए | १८००० | २० जून २०१६ |

विद्यापीठाने विद्याशाखानिहाय घेतलेल्या / घेत असलेल्या परीक्षा व या परीक्षांचे जाहिर झालेल्या निकालांचा तपशील खालील प्रमाणे –

| शाखा | एकुण परीक्षा | निकाल जाहिर परीक्षा | निकाल ३० दिवसाच्या आत जाहिर | निकाल ४५ दिवसाच्या आत जाहिर | निकाल ४५ दिवसानंतर जाहिर |
|---|---|---|---|---|---|
| कला | १४० | ४९ | १५ | २३ | ११ |
| वाणिज्य व व्यवस्थापन | ८३ | - | - | - | - |
| विज्ञान | ४६ | १५ | ०२ | ०५ | ०८ |
| विधी | १६ | - | - | - | - |
| तंत्रज्ञान | १३८ | १६ | - | ०४ | १२ |
| एकुण | ४२३ | ८० | १७ | ३२ | ३१ |

तसेच उर्वरीत सर्व परीक्षांच्या उत्तरपत्रिकांच्या मुल्यांकनाचे काम सुरु असून , या परीक्षांचे निकाल शक्य तितक्या लवकर जाहिर करण्यासाठी परीक्षा विभाग प्रयत्नशील आहे.

लीलाधर बन्सोड, उपकुलसचिव (जनसंपर्क)